ePaper

# कुणबी शब्दाची लाज वाटते त्यांनी शेती विकून चंद्रावर जावे – जरांगे पाटील

| वर्ष - 7 | अंक - 191 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- विजयासाठी किती धावा पुरेशा?
- प्रियांकने दोन पेंटहाऊस विकले
- तेलंगणमध्ये काँग्रेसच्या बाजूने लाट
- तर आम्ही शांत बसणार नाही


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 19 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लेखक नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासून केली मारहाण

# पाच कोटी मराठ्यांवर हल्ला!

### »भ्याड हल्ल्यांना मी घाबरणार नाही : नामदेव जाधव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील पत्रकार भवन येथे लेखक नामदेव जाधव यांच्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील शरद पवार यांच्या गटातील कार्यकर्त्यांनी शाहीफेक करत मारहाण केली. या हल्ल्याबाबत प्रतिक्रिया देताना ‘भ्याड हल्ल्यांना मी घाबरणार नाही, लोकशाही, पोलीस आणि 5 कोटी मराठ्यांवरील हा हल्ला असून, या हल्ल्या विरोधात उपोषणाला बसणार आहे. तसेच केंद्रीय गृहमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे लेखक नामदेव जाधव यांनी म्हटले आहे. याबाबत त्यांनी फेसबुकवर लाईव्ह संवाद साधला.**





नामदेव जाधव म्हणाले, पुण्यामध्ये मराठा आरक्षणासंबंधी भूमिका मांडत असताना, मराठा आरक्षणाचे मारेकरी शरद पवार असल्याचे कागदपत्रे त्यांच्या हाती लागले आहेत. हे वास्तव सांगत असताना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना राग अनावर झाला. आज शिवजयंती ऍट सिंगापूर या विषयावर माहिती देण्याचा कार्यक्रम असताना हा कार्यक्रम देखील त्यांनी उधळून लावला.

याबाबत पत्रकार भवन येथे पत्रकारांची संवाद साधतांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी माझ्यावर हल्ला केला. शिव, फुले, शाहू , आंबेडकर यांचे नाव घेणाऱ्या गुंडांनी हा हल्ला करून शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा खून केलेला आहे. छत्रपती (PUNE) शिवाजी महाराज यांचे विचार जगभर जाऊ नयेत यासाठी त्यांनी माझ्यावर केलेला हा हल्ला आहे.

माझ्या सोबत पोलीस कर्मचारी असताना माझ्यावर हा हल्ला झाला आहे. पोलीस कर्मचारी कांबळे यांनी माझे जीवा महाले यांच्या सारखे संरक्षण केले आहे. माझ्यासह पोलीस कर्मचा-यांच्याही जीवाला धोका होता. एक प्रकारे हा लोकशाही वरील हल्ला आहे. संबंधित लोकांवर गुन्हे दाखल करण्याची मी मागणी करीत आहे,’ असे त्यांनी म्हटले. ‘कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणारा हा हल्ला आहे. या संदर्भात जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाईची मागणी मी करत आहे. मी व्यक्तिगत स्वार्थासाठी भांडत नव्हतो, मराठा आरक्षणासंदर्भात हा विषय होता. त्यामुळे 5 कोटी मराठ्यांवरील हा हल्ला आहे. याबाबत मी पोलीस आयुक्तालयात जाऊन कायदेशीर कारवाई करणार आहे. एफआरआय मध्ये पहिले नाव हे कार्यकर्त्यांचे नाहीतर शरद पवारांचे असणार आहे. तर दुसरे नाव रोहित पवारांचे असणार आहे. दोघांचीही आमदारकी आणि खासदारकी रद्द करण्यासाठी मी प्रचंड मोठे पाऊल उचलणार आहे. हा गुंडागर्दीचा कार्यक्रम महाराष्ट्रात चालू देणार नाही. जिजाऊंनच्या वंशजावर आणि शिवरायांच्या चरित्रकारांवर हल्ला म्हणजे महाराष्ट्रावर हा हल्ला आहे. मराठ्यांनो आता तुम्ही विचार करायला पाहिजे, कारण मराठा आरक्षणाच्या मारेक-यांचे पितळ उघडे पडल्याने, कागदाचे उत्तर (PUNE) कागदाने, विचारांचे उत्तर विचारंनी देण्याएवजी त्यांनी हातामध्ये लाठ्याकाठ्या व शस्त्र घेत हल्ला करणे हा गंभीर अपराध आहे. हा शाहू फुले आंबेडकरांच्या विचारांचा खून आहे. तसेच पोलिसांवर देखील हल्ला झाल्याने कायदेशीर कारवाई गृहमंत्र्यांनी केली पाहिजे.

### कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या गुंड आणि म्होरक्यावर कारवाई व्हावी

» कायदा व सुव्यवस्था बिघडवना-या राष्ट्रवादीच्या गुंड लोकांवर आणि त्यांच्या म्होरक्यांवरसुद्धा कडक कारवाई करण्याची अपेक्षा करीत आल्याचे त्यांनी म्हटले. याबाबत मराठ्यांनी कायदा व सुव्यवस्था न बिघडवता कायद्याने चोख उत्तर दिले पाहिजे. तसेच या भ्याड हल्ल्यांना मी घाबरणार नाही, औरंगजेब आणि त्याच्या 7 लाख सैन्यांना आम्ही घाबरलो नाही, अशा गुंडांना देखील घाबरणार नाही. हा अन्यायाविरोधातील लढा सुरूच राहील. या हल्ल्याच्या विरोधा त उपोषणाला बसणार असून या हल्ल्याचे उत्तर शरद पवार आणि रोहित

## प्रस्तावित कचरा डेपो विरोधात पुनावळे रहिवासी यांचे मूक आंदोलन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पुनावळे येथे नव्याने घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभाण्यासाठी भूखंड आरक्षित करण्यात आले असून, त्यानुषंगाने महापालिकेने आढावा घेण्याचे कामकाज सुरु केले आहे. या पार्श्वभूमीवर पुनावळे येथे होणाऱ्या कचरा डेपोला विरोध करण्यासाठी पुनावळे येथील रहिवाश्यांनी काळे वस्त्र परिधान करून विरोधाचे संदेश असणारे बॅनर आणि पोस्टर्स घेऊन रस्त्याच्या कडेला उभे राहून निदर्शने केली.

पुनावळे येथील 18 लटीट्यूड मॉल समोर आणि परिसरातील विविध चौकात ही मूक निदर्शने करण्यात आली असून यावेळी मोठ्या संख्येने पुनावळेतील नागरिक, महिला व लहान मुले उपस्थित होते. दि. 21 नोव्हेंबर रोजी पुनावळे रहिवाश्यांच्या वतीने महापालिकेवर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

या मोर्चाची रूपरेषा लवकरच ठरणार आहे. या कचरा डेपोला शहरतील अनेक लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविला आहे.



# मराठा आरक्षण सोपा विषय नाही!

## » आरक्षणाणसाठी मागासवर्ग आयोगाची भूमिका महत्त्वाची

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. मराठा आरक्षण हा विषय सोपा नाही. समाजाला आरक्षण मिळण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करावा लागेल, अशा शब्दांत स्वराज पक्षाचे प्रमुख माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शनिवारी पुण्यात केली.**

राज्य मागासवर्ग आयोगाची शनिवारी शासकीय विश्रामगृहात बैठक बोलावली आहे. या बैठकीआधी संभाजीराजे यांनी आयोगाची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. संभाजीराजे म्हणाले, की १५ दिवसांपूर्वी आयोगाला पत्र पाठवले होते. त्यानुसार शनिवारी पुण्यात बैठकीआधी आयोगाने वेळ दिली. आयोगासमोर मराठा समाजाचे काही प्रश्न मांडले. गरीब मराठा समाजावर अन्याय होत आहे. रोहिणी आयोगाची शिफारस, क्युरेटिव्ह याचिका कुणबी-मराठा, मराठा-कुणबी समाजाला सरसकट आरक्षण देता येते किंवा कसे? पोटजात मराठा यान अडेऊ शकता का? गायकवाड आयोगाने दिलेले पुरावे तपासले किंवा कसे? आदी मुद्द्यांवर चर्चा केली. आयोग स्वायत्त आहे, त्यावर कोणाचे बंधन नाही. मी समाजाच्या वतीने मांडलेल्या प्रश्नांची आयोगाने उत्तरे दिली नाहीत, मात्र या मुद्द्यांचा विचार केला जाईल, असे सांगितले. आयोगाच्या पुण्यातील कार्यालयाला मी भेट दिली. हे कार्यालय एक हजार चौरस फूट देखील नाही. त्यामुळे संग्रहित



केलेली माहिती कुठे ठेवणार? त्यामुळे आयोगाला निधी मिळणे आवश्यक आहे. आयोगाला स्वतंत्र जागा देणे महत्वाचे आहे. मागासवर्ग आयोगाला सरकारने केवळ अधिकार, स्वायत्तता देऊन उपयोग नाही. पायाभूत सुविधा, आवश्यक मनुष्यबळ देणे गरजेचे आहे. तरच आयोग चांगल्या पद्धतीने काम करेल. असेही छत्रपती संभाजीराजे यांनी या वेळी सांगितले. संपूर्ण यंत्रणा दिल्याशिवाय आयोगाकडून शास्त्रोक्त पद्धतीने कामकाज होऊ शकणार नाही, असेही संभाजीराजे यांनी स्पष्ट केले. मराठा, ओबीसी एक राहिले पाहिजे. कोणीही असे वक्तव्य करू नये, जेणेकरून समाजात तेढ निर्माण होईल, असे आवाहन संभाजीराजे यांनी या वेळी केले. संभाजीराजे छत्रपती म्हणाले, "१५ दिवसांपूर्वी मी राज्य मागासवर्ग आयोगाला पत्र लिहून भेटण्यास वेळ देण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे त्यांनी आज पुण्यात बैठक असताना मला निमंत्रित केलं. म्हणून मी आज त्यांना भेटायला आलो. या बैठकीत मी समाजाचे १०-१२ प्रश्न मांडले. यात मराठा समाजाला आरक्षण कसे मिळू शकते, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश कशाप्रकारे लागू होऊ शकतात, आरक्षणासाठीची आंदोलने अशा अनेक विषयांचा समावेश आहे." "मला वाईट इतकंच वाटलं की, मी राज्य मागासवर्ग आयोगाला भेट दिली. माझी बैठक तेथेच होईल, असं मला अपेक्षित होतं. मात्र, मागासवर्ग आयोगाला दिलेलं कार्यालय १००० चौरस फूटही नसेल. त्यामुळे त्यांनी मला सर्किट हाऊसला बोलावलं. पुण्यासारख्या ठिकाणीही राज्य मागासवर्ग आयोगाचं कार्यालय एक हजार चौरस फूटही नाही. अशा स्थितीत ते सर्व्हे करणं, माहिती संकलित करणं अशी कामं कशी करू शकतात," असा प्रश्न संभाजीराजेंनी व्यक्त केलं. "माझी सरकारला विनंती आहे की, सरकारने पैसे दिल्याशिवाय मागासवर्ग आयोग मजबूत होऊ शकणार नाही. आयोगाकडेच पायाभूत सुविधा नसतील, तर ते काम कसं करणार? आयोगाकडून काम करून घ्यायचं असेल, तर सरकारने ताबोडतोब आयोगाला पायाभूत सुविधा, कार्यालय, निधी दिला पाहिजे. सरकारने युद्धपातळीवर आयोगाला मदत केली पाहिजे. त्याशिवाय आयोगाला इंपेरिकल डेटा गोळा करायला लावण्यात अर्थ नाही.

### मला वाईट इतकंच वाटलं की

» "मला वाईट इतकंच वाटलं की, मी राज्य मागासवर्ग आयोगाला भेट दिली. माझी बैठक तेथेच होईल, असं मला अपेक्षित होतं. मात्र, मागासवर्ग आयोगाला दिलेलं कार्यालय १००० चौरस फूटही नसेल. त्यामुळे त्यांनी मला सर्किट हाऊसला बोलावलं. पुण्यासारख्या ठिकाणीही राज्य मागासवर्ग आयोगाचं कार्यालय एक हजार चौरस फूटही नाही. अशा स्थितीत ते सर्व्हे करणं, माहिती संकलित करणं अशी कामं कशी करू शकतात," असा प्रश्न संभाजीराजेंनी व्यक्त केलं.

# नामदेव जाधवांच्या तोंडाला फासलं काळं

## » पवारांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध वक्ते नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना पुण्यात घडली. माध्यमांशी बोलत असतानाच पवार समर्थकांनी अचानक नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासले. यावेळी पोलिसांनी नामदेव जाधव यांचा बचाव करत घटनास्थळावरून त्यांना बाजूला नेले.**

पवार समर्थकांनी नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासत असताना पवारांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. जाधवांना काळे फासण्यात पवार गटाच्या महिला कार्यकर्त्यांचाही समावेश होता. नामदेव जाधव यांनी शरद पवार यांच्या जातीचा खोटा दाखला प्रसिद्ध केला होता. तसेच पवारांवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर ही घटना घडली आहे. नामदेव जाधव हे सातत्याने वादग्रस्त विधान करीत होते.



### म्हणून जाधवांना काळ फासले

» "लोकशाहीत टीका करण्याचा अधिकार नक्की आहे. पण, खऱ्या पुराव्यांच्या आधारावर टीका करावी. शरद पवारांवर नाहक खोटे आरोप करण्यात येत होते. नामदेव जाधवांना टीका करू नका, इसा इशाराही दिला होता. पण, ते थांबले नाहीत. म्हणून जाधवांना कार्यकर्त्यांनी काळ फासले," असं स्पष्टीकरण प्रशांत जाधवांनी दिलं आहे.

त्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन महाविद्यालय येथे होणाऱ्या नामदेव जाधव यांच्या कार्यक्रमाला विरोध केला. तसेच त्यांनी जाधव यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा दिला. यानंतर भांडारकर संस्थेने कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून नामदेव जाधव यांचा कार्यक्रम रद्द केला.

त्याच दरम्यान नवी पेठेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नामदेव जाधव यांच्या चेहऱ्याला काळे फासले. याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी स्वीकारली आहे. संवाध साधताना प्रशांत जगताप म्हणाले, "या आंदोलनाची जबाबदारी आम्ही स्वीकारतो. नामदेव जाधवांना खंडणीच्या गुन्ह्यात विक्रोळी पोलिसांनी अटक केली होती. तसेच, पैसे घेऊन मुलांचे गुण वाढल्याप्रकरणी शाळेतून जाधवांची हकालपट्टीही झाली होती. आता जाधव शरद पवारांवर टीका करत आहेत."

# पुणे विद्यापीठासाठी नवीन कार्यप्रणाली!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये शनिवारी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्यासोबत सुसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही मार्गाने विद्यापीठातल्या विविध प्रश्नांबाबत विविध संघटनांमार्फत होणारी आंदोलने, सभा, कार्यक्रम आदींसाठी सर्वसंमतीने कार्यप्रणाली विकसित करण्याचे ठरविण्यात आले.

ही कार्यप्रणाली सर्वांच्या विचारार्थ ठेवावी असे आवाहन विद्यार्थी संघटनांच्या वतीने करण्यात आले.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, पुण्याचे पोलिस आयुक्त रितेश कुमार, अपर पोलिस आयुक्त रंजन शर्मा, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ.विजय खरे, माजी पोलिस अधिकारी जयंत उमराणीकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, विद्यापीठाचे सुरक्षा संचालक सुरेश भोसले आदी उपस्थित होते.

डॉ. काळकर यांनी या बैठकीचे प्रास्ताविक केले. कुलगुरू डॉ. गोसावी यांनी मागील परिस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची प्रतिमा कशी उंचावेल यासाठी एकत्रित काम करणे गरजेचे आहे. विद्यार्थी हा शैक्षणिक संकुलाचा कणा आहे आणि त्यांच्या सोबतच्या समन्वयानेच विद्यापीठाची भविष्यात प्रगती होणार आहे.' शर्मा यांनी विद्यार्थ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून सर्व प्रक्रियांचे पालन केल्यास पोलिस प्रशासन कोणतीही कारवाई करणार नसल्याची हमी दिली.

# अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या मशीनचा हडपण्याचा डाव?

## कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंता निलंबित

। पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या भोसरी, एमआयडीसीतील एका कंपनीसमोरील बंद अवस्थेतील पाच फोर्क लिफ्ट मशीन जाणीवपूर्वक पाच महिने दुसरीकडे ठेवल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले. त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले.**




संतोष दत्तात्रय शिरसाठ असे निलंबित केलेल्या कनिष्ठ अभियंत्याचे नाव आहे. शिरसाठ हे क क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे बीट निरीक्षक, अतिक्रमण पथक प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली होती. चिखली, मोशीतील, अनधिकृत कच्ची, पक्की घरे, पत्राशेड, हातगाड्या, टप-या, पथारीवाले, फळ विक्रेते, किऑक्सवरील कारवाईसाठी नेमणूक केली होती.

शिरसाठ यांनी भोसरी, एमआयडीसी येथील एका कंपनीसमोर ब-याच वर्षापासून बेवासरपणे लावलेल्या व बंद अवस्थेत असलेल्या 5 फोर्क लिफ्ट मशिनवर 25 मार्च 2023 रोजी अतिक्रमण कारवाई केली. मशिन हस्तगत केल्या.

या मशिन मोशीतील वाहनतळाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक व अभिप्रेत असताना जवळपास पाच महिने विलंबाने म्हणजे (PCMC) 27 ऑगस्ट 2023 रोजी तक्रारीनंतर अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे जमा केल्याचे दिसून येत आहे. यावरु शिरसाठ यांनी कारवाई करताना नियमित सूचनांचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

किंबहुना मशीन जाणीवपूर्वक क क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात ठेवल्याचे निदर्शनास येत आहे. कामकाजातील अनियमितता, तक्रारीच्या अनुषंगाने शिरसाठ यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली. पण, त्यांचा खुलासा संयुक्तिक नाही.

### विभागीय चौकशी सुरु

» संतोष शिरसाट यांच्या कर्तव्यात नितांत सचोटी, कर्तव्यपराणता न राखता गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केले आहे. याप्रकरणी त्यांची सचोटी अत्यंत संशयास्पद आहे. त्यांच्या गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे. ते प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास तपासात अडथळा निर्माण होण्याची भिती आहे. त्यामुळे उपलब्ध पुराव्यात फेरफार होऊ नये यासाठी शिरसाठ यांना निलंबित करण्यात आले. त्यांची विभागीय चौकशी सुरु केली आहे.

---

# छट पूजेच्या पार्श्वभूमीवर विसर्जन घाटांवर विविध संघटना व पालिकेच्यावतीने तयारी!

## सकाळी पहिली गंगा आरती व सायंकाळी सूर्यास्त पूजन उत्तर भारतीय नागरिकांकडून करण्यात येणार



। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तर भारतीय बांधवांचा (PIMPRI ) वर्षभरातला महत्वाचा सण अशी ओळख असलेल्या छट पूजेच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध विसर्जन घाटांवर अनेक सामाजिक संघटना व महापालिकेच्या वतीने जय्यत तयारी सुरु आहे.**

दि.19 व 20 नोव्हेंबर रोजी छट पूजेच्या पार्श्वभूमीवर सकाळी पहिली गंगा आरती व सायंकाळी सूर्यास्त पूजन उत्तर भारतीय नागरिकांकडून करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरात अनेक दशकांपासून लाखोंच्या संख्येने उत्तर भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत.

### महिलांना बसून पूजा करण्याची सोय

» दरवर्षी त्यांच्याकडून छट पूजेच्या निमित्ताने पवना, मुळा, इंद्रायणी नदींच्या विसर्जन घाटांवर पहिली गंगा आरती व सूर्यास्त पूजन करण्यात येते. या वर्षीही मोठ्या संख्येने छट पूजा करण्यात येणार आहे. विसर्जन घाटावर छट पूजेसाठी लागणारे 'बेदी' मोठ्या संख्येने उभारण्यात आले आहेत. तसेच महिलांना बसून पूजा करण्याची सोय देखील करण्यात आली आहे. महापालिकेच्या वतीने विसर्जन घाटांवर स्टेज उभारण्यात आले असून याठिकाणी अनुषंगीक कार्यक्रम पार पडणार आहेत.

---

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांचा सन्मान

## पैलवान शेख यांना सर्वोतोपरी मदतीची ग्वाही

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



**महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अजिंक्यपद मिळवलेल्या आणि आपल्या कुस्तीने देशात महाराष्ट्राचा मान वाढवणारे महाराष्ट्रातील पैलवान सिकंदर शेख यांनी पिंपरी- चिंचवड शहरात असताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्या इंद्रायणीनगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. युवक काँग्रेसच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या वतीने महाराष्ट्र केसरी विजेता सिकंदर शेख यांचा सत्कार केला गेला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे आत्मचरित्र 'लोक माझे सांगाती' हे पुस्तक तसेच रोख रक्कम देण्यात आली. तसेच येणाऱ्या काळात देखील पैलवान शेख यांना सर्वपतरी मदत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून दिली जाईल अशी ग्वाही युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी दिली.तसेच युवा महाराष्ट्र केसरी किशोर नखाते यांचा देखील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला. युवक पदाधिकारी यांनी महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांच्याबरोबर संवाद साधला. तसेच या आपल्या लाडक्या पैलवान सिकंदर शेख बरोबर सेल्फी काढण्यासाठी तरुणांनी गर्दी केली होती.

### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

» राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश संघटक राहुल पवार, शहर कार्याध्यक्ष सागर तापकीर, उपाध्यक्ष ओम शिरसागर,प्रसिद्ध उद्योजक सुधाकर भोसले,पूजाआल्हाट, स्वप्नाली असोले, रजनीकांत गायकवाड,केतन होके, अशरफ शेख,दर्शन लांडगे, शाहिद बागवान, उमर शेख, अनुज देशमुख,साहेबलाल शेख, केतन पूनममीया, अजीम शेख, प्रशांत जाधव, सिद्धांत कसबे, विजय वाघमारे, योगेश लांडगे,इरफान शेख आणि मोठ्या संख्येने युवक पदाधिकारी उपस्थित होते.

# कशाला हवी जंगलांची अडचण ?




**राज्यातील व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वनक्षेत्रात होऊ घातलेली खाणकामे, तसेच नव्या विकास प्रकल्पांबाबत अलीकडेच राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. संबंधित सर्व प्रस्ताव केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या मंजुरीसाठी पाठवण्याची शिफारसही करण्यात आली. यामुळे वेगवेगळ्या प्रकल्पांमधील लाखो झाडे तोडली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



एकंदरीत पर्यावरण आणि जंगल रक्षणाच्या बाबतीत वास्तव काय आणि आभास कशाचा यावर थोडा विचार केला तर समोर येणारे चित्र भीषण आहे. गेल्या नऊ वर्षांत विविध सरकारी व खासगी प्रकल्पांसाठी बेसुमार जंगलतोडीला परवानगी देण्यात आली हे वास्तव. तर याच काळात जंगल वा वनाच्छादन वाढले हा सरकारी पातळीवरून केला जाणारा दावा केवळ आभास. सरकारच्या 'कथित' विकासाची भूक इतकी जबरदस्त आहे की आता प्रकल्पासाठी व्याघ्र प्रकल्पांसाठी राखीव असलेले जंगलही त्यांना अपुरे पडू लागले आहे. सह्याद्रीचा अपवाद वगळता राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प विदर्भात आहेत. या प्रत्येकाच्या बफरक्षेत्रात नव्या खाणी, रस्ते प्रस्तावित करून जंगलतोडीचा घाट घातला जात आहे. नागपूरला लागून असलेले गोंडखैरीचे जंगल पेंच व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट असलेल्या मानसिंग अभयारण्यापासून ३४ तर बोर प्रकल्पापासून केवळ २० किलोमीटर अंतरावर. भविष्यात वाघांची संख्या वाढली तर अडचण नको म्हणून राखून ठेवलेले. आता तिथे अदानीची कोळसा खाण होणार. नागझिरा-नवेगावात गुगलडोह खाणीचा प्रस्तावसुद्धा नुकताच मंजूर झालेला. याशिवाय भारतमाला व समृद्धी महामार्गाचे विस्तारीकरण याच जंगलाच्या मुळावर उठणारे. ताडोबाच्या बफरला लागून असलेले जंगल नव्या कोळसा खाणीसाठी नुकतेच दिलेले. या साऱ्या घडामोडी अस्वस्थ करणाऱ्या पण विकासाचा काळा चष्मा लावलेल्या सरकारवर अजिबात परिणाम न करणाऱ्या. २०१४ पूर्वीपर्यंत अशा प्रकल्पांना मंजुरी मिळवण्यासाठी सरकारी पातळीवर सक्रिय असलेल्या व कायदे व नियमांची कवचकुंडले घालून वावरणाऱ्या विविध समित्यांना सामोरे जावे लागायचे. हेतू हाच की सरसकट जंगलाचा नाश नको. नंतर हे सारे नियम व कायदे शिथिल करण्यात आले. समित्यांवर 'होयबा'चा सुळसुळाट झाला. त्याचे दुष्परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत.सरकारची मूकसंमती असलेले सारे प्रस्ताव जसेच्या तसे मंजूर करण्याचा घातक पायंडा रूढ झाला आहे. हे असेच सुरू राहिले तर जंगल वाचणार कसे? त्यातल्या वाघांनी जायचे कुठे? घनदाट जंगलाची निर्मिती एका रात्रीतून होत नाही. त्यासाठी अनेक तपे जाऊ द्यावी लागतात. त्यातूनच आहे ते जंगल वाचवण्याची संकल्पना समोर आली. मात्र, विकासाच्या नावावर त्यालाच सुरुंग लावण्याचे काम आता राजरोसपणे होत असेल तर पर्यावरण संतुलनाचे काय? हे संतुलन आम्ही राखू, असे सरकार कशाच्या बळावर म्हणते? जगभराचा विचार केला तर भारतात जंगलवाढीचा वेग सर्वात कमी आहे. गेल्या ५० वर्षांत केवळ पाच टक्के जंगल वाढले, त्यातही हरित आच्छादन अधिक. हे वास्तव लक्षात घेतले तर जंगलतोड करूनच विकास साधता येतो या भ्रमातून लवकर बाहेर पडणे गरजेचे. अनेक विकसित देशांनी या भ्रमाचा त्याग केला व पर्यावरणपूरक विकासाची वाट धरली. भारताची वाटचाल मात्र अजूनही त्याच वाटेवरून सुरू आहे. याला मागासलेपण नाही तर आणखी काय म्हणायचे? याच विकासाच्या नावावर गेल्या ४० वर्षांत १६ लाख हेक्टर जंगल नष्ट करण्यात आले. यातील शेवटच्या सात वर्षांत नष्ट होण्याच्या या वेगात कमालीची वाढ झाली. राखीव व संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या जंगलाला हात लावायचा नाही हा नियम चक्क पायदळी तुडवला गेला. आता त्यात भर पडलीय ती व्याघ्र प्रकल्पासाठी राखून ठेवलेल्या जंगलाची. हे असेच सुरू राहिले तर जंगल नावाची गोष्टच देशात उरणार नाही. हेच सरकारला हवे आहे का? याच जंगलाच्या भूगर्भात विकासासाठी आवश्यक असलेली खनिजे दडलेली आहेत, हे मान्य. ती बाहेर काढण्याचे पर्यावरणपूरक मार्ग जगातील अनेक देशांनी विकसित केले.

## संपादकीय »

# विक्रमी विराट!


***विराटने स्वतःचा स्वतंत्र असा मार्ग चोखाळला. त्यातून जे रसायन घडले, त्याचा खुद्द सचिनलाही हेवा वाटतो, हेही विराटचे यशच.***

भारतीय क्रिकेटच्या पंढरीत, क्रिकेटच्या आद्य नायकांसमोर विराट कोहलीने एकदिवसीय शतकांचे विक्रमी अर्धशतकी शिखर सर केले. असा योग फार थोडय़ांच्या नशिबी येतो. विराटचे विक्रमी पन्नासावे शतक विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात झळकणे हे तर अधिकच अभूतपूर्व. वैयक्तिक विक्रम आणि सांघिक कामगिरी यांचा मेळ सहसा साधला जात नाही. विराट कोहलीच्या बाबतीत तोही योग जुळून आला. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत उपांत्य फेरीपर्यंतच्या दहा सामन्यांमध्ये दोन अपवाद वगळता उर्वरित सामन्यांत विराटने पन्नास धावांच्या पलीकडे मजल मारलेली आहे. शतकासमीप आल्यावर विक्रमासाठी सावधपणे खेळू लागतो, असा आरोप विराटवर समाजमाध्यमांवर झाला. तो करणाऱ्या बहुतेकांना भावनिक लाटेवर आरूढ होणे अंगवळणी पडलेले असते आणि बुद्धी नामे आदिम मानवी गुणाचा विसर पडलेला असतो.

**बी. एन. गोस्वामींच्या नावातली 'बीएन' ही अक्षरं ब्रिजेन्द्रनाथ या त्यांच्या नावाची आहेत, हे त्यांच्या मृत्यूनंतरच अनेकांना कळलं असणार. या नावाचा संबंध कृष्णलीलांच्या व्रजभूमीशी आहे आणि ती भूमी किती प्राचीन हे सांगायला नकोच. गोस्वामींची कर्मभूमी असलेलं चंडीगढ मात्र नव्यानं वसवलं गेलेलं (शहर.. या शहराचा सांधा प्राचीन कलाप्रवाहांशी जोडण्यात गोस्वामींचा मोठा वाटा होता.**

# जुन्या चित्रांकडे नव्यानं पाहणारा विद्वान..

चंडीगढच्या पंजाब विद्यापीठातलं कला संग्रहालय गोस्वामींमुळे नावारूपाला आलं. राज्यस्तरीय ललित कला अकादम्या अनेक आहेत, पण पंजाबच्या ललित कला अकादमीचं नाव संशोधनासाठी अधिक झालं ते गोस्वामींच्या अनेक शिष्यांमुळे. गोस्वामी यांनी किमान २७ पुस्तकं, भारताच्या दृश्यकला-वारशाबद्दल लिहिली. त्यातही चित्रांबद्दलची पुस्तकं अधिक, हे विशेष. कारण प्राचीन भारतीय शिल्पकलेचा अभ्यास पुरातत्त्वशास्त्राच्या अंगानं होतो आणि त्याला कलेतिहास म्हणूनही मान्यता मिळते. पण हातात धरून पाहाता येण्याजोगी (या चित्रांना 'लघुचित्रं' म्हणून ओळखलं जातं, पण गोस्वामींना या शब्दानं चित्राच्या आशयावर अन्याय होतो असं वाटे, म्हणून 'हॅण्ड हेल्ड पेंटिंग्ज') चित्रं कागद अथवा कापडावर रंगवण्याच्या कितीतरी शैली भारतात सोळाव्या शतकापर्यंत विकसित झालेल्या होत्या. या चित्रांचे चित्रकार



मात्र अज्ञात होते, किंवा चित्रावर कुठंतरी नावाचा उल्लेख असूनही त्या गतकालीन चित्रकारांना स्वतःची अशी काही ओळखच नव्हती.. ही ओळख मिळवून देण्याचं काम पहिल्यांदा बी.एन. गोस्वामी यांनी केलं. ते कसं? नैनसुख या चित्रकाराबद्दल गोस्वामींनी अख्खं पुस्तक लिहिलं. अठराव्या जसरोटा संस्थानचे राजे बलवंतसिंग यांच्या पदरी चित्रकार म्हणून नैनसुख हा गुलेर या गावातून आला होता. त्यासाठी गोस्वामी गुलेरला गेले. नैनसुखची वंशावळ त्यांनी शोधली. या भारतीय चित्रकलेत केवळ विविध शैलींचीच वैशिष्ट्यं जपली जात होती असं नाही, तर अनेक कुटुंबं होती आणि ती आपापल्या विशिष्ट पद्धतीनंच काम करायची, हे गोस्वामींनी सिद्ध केलं. या चित्रकार-कुटुंबांचा शोध घेण्यासाठी त्यांनी काय करावं? अनेक तीर्थक्षेत्रांमधल्या पंड्यांकडे ते गेले,

तुमच्याकडे कुणा यजमानाचा उल्लेख चित्रकार म्हणून आहे का, असं विचारू लागले. यापैकी अनेक पंड्या लोकांनी गोस्वामींना मदत केली.. म्हणजे अख्खं बाड धुंडाळू दिलं. त्यातूनही अनेक चित्रकारांची नावं-गावं मिळाली. त्यांची ही वणवण कुठेकुठे स्फुटलेखन, भाषणं, क्वचित शोधनिबंध स्वरूपात कारणी लागत होतीच, पण 'पहाडी मास्टर्स – कोर्ट पेंटर्स ऑफ नॉर्दर्न इंडिया' या पुस्तकातून तिचं सार्थक झालं. या पुस्तकाची १९९० मधली आवृत्ती जर्मन भाषेतली (म्हणजे अनुवादित) आहे आणि तोवर हायडेलबर्ग विद्यापीठात गोस्वामी अभ्यागत प्राध्यापक म्हणून जाऊ लागले होते हेही कुठकुठल्या संग्रहात असलेल्या कलाकृतींचा अभ्यास करणं, हे कलेतिहासकारांचं कामच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरक्षण पाहिजे मग त्यात लाज वाटण्यासारखं काय ?

## » ते त्यांनी शेती विकून चंद्रावर जावे : जरांगे पाटील

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा समाजातील काही जणांना कुणबी दाखला नको असे मत आहे. आपल्याला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे, मग कुणबी का नको. ज्यांना कुणबी शब्दाची लाज वाटते त्यांनी शेती विकून चंद्रावर जावे, असा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी साताऱ्यात दिला. सातारा येथे गांधी मैदानावर आज शनिवारी मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षणासाठी सभा झाली.**

यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. शिंदे, फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली. मराठा समाजातील काहींना कुणबी म्हणून घेण्यास लाज वाटते त्यांनाही फटकारले. मराठा आरक्षणावरून ओबीसी आणि मराठा समाजामध्ये भांडण लावण्याचे काम राजकारण्यांकडून सुरु आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळणार आहे आणि ते ओबीसी मधूनच मिळणार आहे. फक्त मराठा समाजाने थोडा संयम ठेवावा. आपण एकत्र आलो आहोत. आपली भाषा सरकारला चांगली कलती आहे. मराठ्यांना आरक्षण सरकारला द्यावेच लागेल. नाही दिलं तर काय होतं ते त्यांनी आंदोलनातून बघितलं आहे, असं सांगून जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. महाराष्ट्र सदन घोटाळा करून तुम्ही जगलेल्यांबद्दल जास्त बोलण्याची आणि त्यांना जास्त महत्व देण्याची गरज नाही. मराठा समाजाने त्यांना किंमत



देण्याची गरज नाही. घटनेच्या पदावर बसलेल्या व्यक्तीने कायदा पायदळी तुडवणे योग्य नाही. मी टप्प्यात आला की वाजवतो. भुजबळांवर बोलावे इतकी त्याची लायकी नाही. व्यक्ती म्हणून त्यांना खूप किंमत आहे, पण आरक्षणाच्या आडवे आल्याने त्यांना किंमत नाही. आता आपल्याला ओबोसी मधूनच आरक्षण मिळणार, हे माहित झाल्याने ते समाजा-समाजामध्ये भांडण लावत आहेत, असेही जरांगे म्हणाले. शेती करणे म्हणजे कुणबी होय. ज्याला कुणबी शब्दाची लाज वाटते त्याने शेती विकून चंद्रावर जावे. आरक्षण पाहिजे मग त्यात लाज वाटण्यासारखं काय आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मी प्रांतीय भेदभाव करत नाही. मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र असा भेद करणार नाही. २४ डिसेंबरला सरसकट आरक्षण देण्याचे शासनाने आश्वासन दिले म्हणून उपोषण मागे घेतले. पण आता मराठा समाजाने सावध राहावे. माझा जीव गेला तरी मी आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच गावागावांत साखळी उपोषण सुरु करण्याचा सल्ला दिला. आपल्याला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे आहे. मग कुणबी म्हणून घ्यायला लाज वाटायचे कारण नाही. शेती करणे म्हणजे कुणबी. ज्याला कुणबी शब्दाची लाज वाटते त्याने शेती विकून चंद्रावर जावे, असा सल्ला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी साताऱ्यातील सभेत दिला. सभेला सातारा पंचक्रोशीतील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ते समाजामध्ये भांडण लावत आहेत

» महाराष्ट्र सदन घोटाळा करून तुम्ही जगलेल्यांबद्दल जास्त बोलण्याची आणि त्यांना जास्त महत्व देण्याची गरज नाही. मराठा समाजाने त्यांना किंमत देण्याची गरज नाही. घटनेच्या पदावर बसलेल्या व्यक्तीने कायदा पायदळी तुडवणे योग्य नाही. मी टप्प्यात आला की वाजवतो. भुजबळांवर बोलावे इतकी त्याची लायकी नाही. व्यक्ती म्हणून त्यांना खूप किंमत आहे, पण आरक्षणाच्या आडवे आल्याने त्यांना किंमत नाही. आता आपल्याला ओबोसी मधूनच आरक्षण मिळणार, हे माहित झाल्याने ते समाजा-समाजामध्ये भांडण लावत आहेत, असेही जरांगे

# तर आम्ही शांत बसणार नाही

## » भुजबळांनी केलेल्या टीकेवरून आरोप-प्रत्यारोप

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जालन्यातील अंबड येथे 'ओबीसी आरक्षण एल्गार सभा' पार पडली. या सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना लक्ष्य केलं होतं. याचे पडसाद राज्यभर उमटले असून छगन भुजबळांवर टीका होत आहे. आता भाजपा नेते, नरेंद्र पाटील यांनीही छगन भुजबळांना इशारा दिला आहे.**

"भुजबळ पहिल्यापासून मराठा द्वेषी आहेत. आम्ही जरांगे-पाटलांच्या पाठिशी उभे आहोत. जरांगे-पाटलांना



डिवचलं, तर आम्ही शांत बसणार नाही," असं नरेंद्र पाटलांनी म्हटलं आहे. नरेंद्र पाटील म्हणाले, "छगन भुजबळांनी विविध पदांवर काम केलं आहे. मराठा समाजाच्या सहकार्यानं काम करत असल्यानं भुजबळांनी सांगितलं आहे. पण, 'ओबीसी एल्गार सभे'तून भुजबळांची वैचारिक भूमिका समोर आली आहे. भुजबळ पहिल्यापासून मराठाद्वेषी आहेत." "महाराष्ट्रातील प्रत्येक मराठा आमदार जरांगे-पाटलांच्या पाठिशी उभे आहे. त्यामुळे जरांगे-पाटलांना डिवचलं तर आम्ही शांत बसणार नाही. तुम्ही ओबीसी आरक्षणाचा मुद्दा मांडा. आम्हाला त्याच्याशी देणं-घेणं नाही. जरांगे-पाटलांबद्दल चुकीचं वक्तव्य केल्यास जशास तसे उत्तर देणार," असा इशारा नरेंद्र पाटलांनी भुजबळांना दिला आहे. दरम्यान, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी छगन भुजबळांची मंत्रीपदावरून हकालपट्टी करण्याची मागणी केली होती. छगन भुजबळ हे राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य ओबीसी बांधवांचा मराठा समाजास कोणताही विरोध नसताना केवळ आपले राजकीय स्थान टिकवण्यासाठी दोन समाजांत नसलेली भांडणं लावण्याचं पाप करत आहेत.

# अलिबाग : श्रीबाग शाखेच्या फसवणूकीत मॅनेजर सामील

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

नियमात नसतानाही कर्ज मंजूर करणे, खोटे वेतन पत्रक देणे, असा गैरप्रकार करून अलिबाग शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया, श्रीबाग शाखेतील तत्कालीन शाखा व्यवस्थापक, क्षेत्रीय अधिकारी व कर्जदारांनी बँकेची ४१ लाख ६७ हजार ६६७ रुपयांची फसवणूक केली आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात २७ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये स्थानिकांसह ठाणे जिल्हा व गुजरात राज्यातील आरोपींचा समावेश आहे. बँकेचे शाखा व्यवस्थापक संतोष यमगेकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शैशव नलावडे हे २ जुलै २०१८ ते २४ मे २०२१ या कालावधीत श्रीबाग येथील स्टेट बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम पहात होते तर, अमिताभ गुंजन हे क्षेत्रीय अधिकारी म्हणून होते. श्रीबाग एसबीआय शाखेचे ऑडिट २६ मे २०२२ रोजी पुणे येथील ऑडिट विभागाकडून झाले. त्यामध्ये नलावडे आणि गुंजन या दोघांनी मिळून एक्स्प्रेस क्रेडिट लोन या योजनेअंतर्गत ६५ जणांना वेगवेगळ्या रकमेचे कर्ज मंजूर केल्याचे निर्दशनास आले. त्यामध्ये कर्जदार कर्ज मंजूर करण्याच्या कोणत्याही नियमात बसत नसतानाही त्यांचे कर्ज मंजूर झाल्याचे आढळून आले.

# येडियुरप्पा यांचा पुन्हा एकदा वरचष्मा!

## » येडियुरप्पा यांचे कर्नाटकाच्या राजकारणात पुनरागमन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी कर्नाटक भाजपाने अद्याप विधानसभा विरोधी पक्षनेते ठरविला नव्हता. गेल्या अनेक काळापासून रिक्त असलेले प्रदेशाध्यक्षपदी नेता निवडल्यानंतर आता माजी उपमुख्यमंत्री आणि सात वेळा आमदार असलेले आर. अशोका यांना शुक्रवारी विरोधी पक्षनेता म्हणून घोषित करण्यात आले. कर्नाटक विधानसभेत भाजपाचे ६६ आमदार आहेत. भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र यांनी ६५ वर्षीय अशोका यांची विरोधी पक्षनेत्यापदी एकमताने निवड केली.**

अशोका हे वोक्कलिगा समाजाचे नेते असून माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी त्यांचे नाव सुचविले आणि माजी मंत्री व्ही. सुनील कुमार यांनी त्याला अनुमोदन दिले. दोन्ही नेत्यांनी विरोधी पक्षनेते पदासाठी अनेक नेत्यांची नावे पुढे केली होती. मात्र अखेरीस सहा महिन्यांनी अशोका यांची निवड झाली. अशोका हे बी. एस. येडियुरप्पा यांचे निकटवर्तीय असल्याचे सांगितले जाते. त्यांना विरोधी पक्षनेते पद बहाल केल्यामुळे बी. एस. येडियुरप्पा यांचे कर्नाटकाच्या राजकारणात पुनरागमन झाल्याचे बोलले जात आहे. दोनच दिवसांपूर्वी त्यांच्या मुलाला प्रदेशाध्यक्ष पद दिले गेले होते. शुक्रवारी झालेल्या पक्षाच्या बैठकीत भाजपामध्ये दोन गटही दिसून आले. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री बसवराज पाटील यतनाळ यांनी आंदोलन केले. ते विरोधी पक्षनेत्यासाठी इच्छुक होते, त्याआधी प्रदेशाध्यक्ष पद मिळण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते. येडियुरप्पा यांच्याप्रमाणेच लिंगायत नेते असलेल्या यतनाळ यांनी म्हटले की, उत्तर कर्नाटकातील एखादा व्यक्ती पक्षाचा नेता का होऊ शकत नाही? फक्त दक्षिण कर्नाटकामधीलच नेत्यांना पक्षात महत्त्वाची पदे कशी काय मिळतात? सहा महिन्यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान केंद्रीय नेतृत्वाने येडियुरप्पा यांना महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला.



राष्ट्रीय संघटक सचिव बी. एल. संतोष यांच्या निकटवर्तीयांची नवी फळी कर्नाटकात उभी करण्यात आली. मात्र विधानसभा निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव झाला, ज्यामुळे आता पक्षाला आपल्या रणनीतीमध्ये पुन्हा नवा विचार करण्याची गरज वाटली. अशोका हे येडियुरप्पा यांचे निष्ठावान समजले जातात. २०२१ साली जेव्हा भाजपाने येडियुरप्पा यांना बाजूला करून बसवराज बोम्मई यांना मुख्यमंत्रीपदावर बसविण्याचा निर्णय घेतला, तेव्हा अशोका यांनी "आम्ही येडियुरप्पा यांच्या पाठिशी आहोत, मी येडियुरप्पा यांच्यासमवेत आहे", अशी रोखठोक भूमिका मांडली. तसेच अशोका यांची निवड केल्यामुळे भाजपाचा नवा मित्र पक्ष जेडी(एस) शी आगामी लोकसभा निवडणुकीत जोडून घेण्यासही मदत होणार आहे. अशोका यांचे जेडीएस पक्षाचे नेते आणि वोक्कलिगा समाजाचे राज्यातील मोठे नेते देवेगौडा कुटुंबियांसोबत चांगले संबंध आहेत. अशोका हे दक्षिण बंगळुरूमधील पद्मनाभनगर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात, याठिकाणी माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे वास्तव्य आहे. गौडा परिवाराशी त्यांचे चांगले संबंध असल्यामुळेच ते या मतदारसंघातून मागच्या सात निवडणुकांपासून विजय होत आले आहेत. एका लिंगायत नेत्याला प्रदेशाध्यक्ष पदी नियुक्त केल्यानंतर आणि वोक्कलिगा समाजाच्या देवेगौडांशी युती केल्यानंतर, भाजपातर्फे विरोधी पक्षनेत्यापदी ओबीसी समाजातील नेत्याची निवड केली जाईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. मात्र अशोका यांची ज्येष्ठता इतर नेत्यांपेक्षा अधिक असल्यामुळे आणि त्यांच्या ३५ वर्षांच्या अनुभवामुळे त्यांना या पदावर निवडण्यात आले. तसेच येडियुरप्पा यांचा मुलगा आणि भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष विजयेंद्र यांचे वय केवळ ४७ आहे. त्यामुळे दुसरा एखादा ज्येष्ठ नेता निवडला असता तर दोघांमध्ये समन्वय राखणे कठीण गेले असते.

### मोदी पुन्हा पंतप्रधान बनविणे हे ध्येय

» भाजपाच्या बैठकीनंतर प्रतिक्रिया देताना अशोका म्हणाले, "नरेंद्र मोदी पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान व्हावेत, एवढीच आमची अपेक्षा आहे. त्यामुळेच नवा विरोधी पक्षनेता निवडताना कोणतीही शंका किंवा अडतळा निर्माण होऊ न देण्याचा प्रयत्न आम्ही केला. मी स्वतः सुनील कुमार आणि अश्वथनारायण यांच्याशी बोललो. कुणीही विरोधी पक्षनेता झाला तरी आम्हाला अडचण नव्हती. पण पक्षाचे हित सर्वप्रथम आहे आणि मोदी यांना पुन्हा एकदा पंतप्रधान बनविणे हे ध्येय.

# तेलंगणमध्ये काँग्रेसच्या बाजूने लाट

## » मोदी सरकार हटवण्याचे लक्ष्य : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसच्या बाजूने तेलंगणमध्ये वादळ असून, सत्तारूढ भारत राष्ट्र समितीचा दारुण पराभव होईल असे भाकीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वर्तवले आहे. खम्मम येथील पिनपका येथील सभेत राहुल गांधी यांनी भारत राष्ट्र समितीवर चौफेर टीका केली. तेलंगणमध्ये जनतेचे सरकार स्थापन करण्याचे काँग्रेसचे ध्येय असून, त्यानंतर केंद्रातील मोदी सरकार हटवण्याचे लक्ष्य असल्याचे राहुल यांनी नमूद केले.**

तेलंगणमध्ये सत्तारूढ भारत राष्ट्र समिती कुठेच दिसत नाही. काँग्रेसने काय केले? असा सवाल मुख्यमंत्री के.सी.आर विचारत आहेत. मात्र तुम्ही ज्या शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये शिकलात त्याची स्थापना काँग्रेसने केली आहे असा टोला राहुल यांनी लगावला. ज्या रस्त्यांवरून प्रवास करता, ते काँग्रेसच्या काळातील आहेत. युवकांच्या पाठिंब्यावर काँग्रेस तेलंगणचा विकास करेल असा विश्वास राहुल यांनी व्यक्त केला. हैदराबाद: तेलंगणमध्ये काँग्रेसने जाहीरनाम्यात चार हजार निवृत्तिवेतन, पाचशे रुपयांत गॅस सिलिंडर याखेरीज विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेटचे आश्वासन दिले आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हस्ते जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. ४२ पानी जाहीरनाम्यात पक्षाने सहा हमी दिल्या आहेत. त्यात सत्तेत आल्यास अडीच हजार प्रति महिना, २०० प्रति युनिट वीज मोफत देण्याचे आश्वासन आहे. विद्या भरोसा कार्डअंतर्गत विद्यार्थ्यांना पाच लाख रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.



### वीज मोफत देण्याचे आश्वासन

» तेलंगणमध्ये काँग्रेसने जाहीरनाम्यात चार हजार निवृत्तिवेतन, पाचशे रुपयांत गॅस सिलिंडर याखेरीज विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेटचे आश्वासन दिले आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हस्ते जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. ४२ पानी जाहीरनाम्यात पक्षाने सहा हमी दिल्या आहेत. त्यात सत्तेत आल्यास अडीच हजार प्रति महिना, २०० प्रति युनिट वीज मोफत देण्याचे आश्वासन आहे. विद्या भरोसा कार्डअंतर्गत विद्यार्थ्यांना पाच लाख रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. यात शैक्षणिक शुल्क व इतर खर्चाचा समावेश आहे.

# गाझा पट्टीमधील निरपराधांच्या मृत्यूंचा पंतप्रधानांकडून निषेध

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इस्रायल-हमास संघर्षात हजारो नागरिकांचा बळी गेल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. तसेच या संघर्षांमुळे पश्चिम आशियात नवी आव्हाने उभी राहिली असून 'ग्लोबल साउथ' देशांनी जागतिक हितासाठी आता एकमुखी आवाज उठवण्याची वेळ आल्याचेही पंतप्रधानांनी नमूद केले. दूरस्थ दृक्-श्राव्य पद्धतीने झालेल्या 'व्हॉइस ऑफ ग्लोबल साउथ' परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी हमास-इस्रायलमधील संघर्षामुळे आशियात उद्भवलेल्या परिस्थितीवर भाष्य केले. पश्चिम आशियातील घटनांमुळे उद्भवत असलेली नवी आव्हाने आपण पाहतच आहोत. पश्चिम आशियातील सद्य परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भारत 'संवाद आणि मुत्सद्देगिरी'वर भर देत असल्याचा पुनरुच्चार मोदी यांनी केला. जागतिक समृद्धीसाठी 'सबका साथ, सबका विकास' या सूत्राची गरज आहे, असेही ते म्हणाले. इस्रायलवर ७ ऑक्टोबरला करण्यात आलेल्या भयानक हल्ल्याचा आणि हमास-इस्रायल संघर्षांत नागरिकांचा बळी गेल्याबद्दल भारत तीव्र निषेध व्यक्त करतो, असे मोदी म्हणाले. मोदी यांनी पॅलेस्टिनी प्रशासनाचे अध्यक्ष महमौद अब्बास यांच्याशी गेल्या महिन्यात झालेल्या दूरध्वनी संभाषणाचा संदर्भही या वेळी दिला. अब्बास यांच्याशी चर्चा झाल्यानंतर भारताने पॅलेस्टिनी नागरिकांना मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत पाठवल्याचेही त्यांनी सांगितले. कन्सल्टेशन, कोऑपरेशन, कम्युनिकेशन, क्रिएटिव्हिटी आणि कपॅसिटी या 'फाइव्ह सी'च्या रचनेनुसार 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' यासाठी आपण एकत्रित पुढे जाऊया, असे आवाहन मोदी यांनी केले.

## आगामी सायको थ्रिलर चित्रपटाची घोषणा!



बॉलिवूडची क्विन म्हणुन ओळखली जाणारी कंगना राणौत ही सध्या तिच्या फ्लॉप चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपुर्वी तिचा चंद्रमुखी 2 आणि त्यानंतर तेजस हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप गेला. त्यामुळे आता तिच्या आगामी 'इमर्जन्सी' या चित्रपटाची चर्चा आहे. आता त्यातच कंगनाने तिच्या आगामी नव्या सिनेमाची घोषणा केली आहे ज्याचे चेन्नईत शूटिंगही सुरू झाले आहे. कंगना रणौतने सोशल मीडियावर पोस्ट शेयर करत तिच्या नवीन चित्रपटाची घोषणा केली. हा चित्रपट सायकोलॉजिकल थ्रिलर आहे. तिने पूजेचा फोटो ट्विटरवर शेअर केला आहे. यासोबत कंगनाने पोस्टमध्ये लिहिले की, "आज आम्ही चेन्नईमध्ये आमच्या नवीन सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात केली. बाकीची माहितीही लवकरच समोर येईल. सध्या या अतिशय रोमांचक स्क्रिप्टला तुमच्या सर्वांच्या समर्थनाची आणि आशीर्वादाची गरज आहे." कंगनाच्या या सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपटात तिच्यासोबत आर माधवन काम करणार असल्याच्या चर्चा आहेच. 'तनु वेड्स मनू' आणि 'तनु वेड्स मनु रिटर्न्स' या चित्रपटात दोघांच्या जोडीने प्रेक्षकांचे खुप मनोरंजन केले होते. त्यामुळे आता या सायकॉलॉजिकल थ्रिलर चित्रपटासाठी हे दोन्ही कलाकार तब्बल 8 वर्षांनंतर एकत्र येणार आहेत. कंगनाने माधवनसोबतचा तिचा जुना फोटो शेअर करत 'तो परत आला आहे' असे म्हटले आहे. त्यामुळे या चित्रपटात त्यांची जोडी जमणार आहे अशी चर्चा सुरु आहे. कंगनाचा आगामी चित्रपट 'इमर्जन्सी' 24 नोव्हेंबर 2023 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन कंगनानेच केले आहे. या चित्रपटात ती भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिकेत दिसणार आहे.

## प्रसाद अमृताचा विवाहसोहळा थाटामाटात!

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय जोडी म्हणजे प्रसाद जवादे आणि अमृता देशमुख. प्रसाद - अमृताच्या लग्नाची चर्चा गेले अनेक महिने सुरु होती. अखेर दोघांचा लग्न सोहळा थाटामाटात पार पडला प्रसाद - अमृताच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झालेत. दोघांच्या चाहत्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केलाय. प्रसाद जवादे आणि अमृता देशमुख यांच्या लग्नाला मराठी कलाकारांनी उपस्थिती दर्शवली. दोघांचे अनेक मित्र इंडस्ट्रीत आहेत. त्यामुळे दोघांच्या लग्नाला नम्रता संभेराव, ओंकार राऊत, सिद्धार्थ खिरीड, आशुतोष गोखले, प्रार्थना बेहेरे हे कलाकार उपस्थित होते.या सगळ्या कलाकारांनी अमृता - प्रसादच्या लग्नात धम्माल केली. प्रसाद - अमृताच्या हळद - मेहंदी - संगीत अशा अनेक विधींमध्ये हे सर्व कलाकार उपस्थित होते.

प्रसाद - अमृताच्या मेहंदीचे फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झालेत. या फोटोत प्रसादने त्याच्या हातावर अमृतमय जाहलो अशी खास मेहंदी कोरलीय. या दोघांच्या या फोटोंवर त्यांच्या फॅन्सनी पसंती दर्शवलीय. याशिवाय हळद आणि संगीत सोहळ्यात प्रसाद - अमृताने धम्माल डान्स केला. अमृताच्या बाबांनी लाडक्या लेकीसाठी खास कविता म्हटली. प्रसाद जवादे - अमृता देशमुख हे बिग बॉस मराठी 4 मध्ये सहभागी होते. या शोमध्ये प्रसाद - अमृतामध्ये चांगली मैत्री झाली. दोघांमध्ये अनेक वाद - विवादही झाले. शोनंतर मात्र दोघे



एकमेकांचे चांगले मित्र झाले. आणि अचानक दोघांनी साखरपुड्याचे फोटो पोस्ट करुन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. अखेर आज प्रसाद - अमृताने एकमेकांशी लग्न करुन सहजीवनाची सुरुवात केलीय.

## प्रियांकाने मुंबईतील दोन पेंटहाऊस विकले

प्रियांका चोप्रा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रियांकाने हॉलीवूडपर्यंत मजल मारली आहे. काही महिन्यांपूर्वीच प्रियांकाची 'सिटाडेल' ही हॉलीवूड वेबसिरीज प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. २०१८ मध्ये प्रियांकाने हॉलिवूड गायक निक जोनासशी लग्नगाठ बांधली. लग्नानंतर प्रियांका पती आणि मुलीबरोबर लॉस एंजेलिसमध्येच राहते.

आता प्रियांकाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. प्रियांकाने मुंबईतील तिची दोन पेंटहाऊस विकल्याचे समोर आले आहे. प्रियांकाने विकलेले दोन्ही पेंटहाऊस अंधेरीमधील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील आहेत. मिळालेल्या माहितीनुसार हे दोन्ही पेंटहाऊस २२९२ स्केअरफूटचे आहेत. यातील एक पेंटहाऊस २.२५ कोटी रुपयांना तर दुसरं पेटहाऊस ३.७५ कोटी रुपयांनी विकण्यात आलं आहे. हे पेंटहाऊस बॉलीवूडचे दिग्दर्शक आणि लेखक अभिषेक चौबे यांनी खरेदी केले आहे. प्रियांकाची आई मधू चोप्रा यांच्या मदतीने हा व्यवहार झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.

## मनोज मुंतशिरचं दुःखचं वेगळं!

प्रसिद्ध गीतकार आणि पटकथा लेखक मनोज मुंतशिर हा गेल्या काही दिवसांपासून पुन्हा चर्चेत आला आहे. मनोज मुंतशिर हा त्याच्या उत्कृष्ट लेखनासाठी ओळखला जायचा मात्र आदिपुरूष या चित्रपटामुळे त्याला टिकेचा सामना करावा लागला. आदिपुरूष चित्रपटातील अनेक संवादांमुळे बराच वाद झाला. वाढता वाद पाहून लेखक आणि निर्मात्यांनी चित्रपटातील संवाद बदलण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बऱ्याच महिन्यानंतर त्याने आपली चुक मान्य केली आणि दुसरी संधी मिळायला हवी असे सांगितले. आता अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान मनोज मुंतशिरने जावेद अख्तर यांचे कौतुक केले. यावेळी त्याने सांगितले की आजपर्यंत तो रॅप गाणी स्वीकारू शकलेला नाही.



## भारताने कप जिंकला तर मी कपड्यांशिवाय फिरेल

गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र वर्ल्ड कप 2023 चे वारे वाहत आहे. त्यातच आता भारताने नॉनस्टॉप सर्व सामने जिंकल्यामुळे भारतीयांसाठी हा वर्ल्ड कप सामना खुपच उत्सुकतेचा ठरणार आहे. आता वर्ल्ड कप 2023 चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात 19 नोव्हेंबर रोजी होणार आहे. हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडणार आहे. हा सामना खुपच दिमाखदार पद्धतीने पार पाडणार असल्याची चर्चा आहे. एकीकडे सर्व क्रिकेटप्रेमी भारताने हा सामना जिंकावा म्हणुन आपआपल्या पद्धतीने प्रार्थना करत आहेत तर काहींनी पब्लिसिटी स्टंट सुरू केले आहेत. त्यातच आता एका साउथ अभिनेत्रीने देखील भारत जिंकल्यानंतर ती काय करणार याची चर्चा सध्या सोशल मिडियावर सुरु झाली आहे. तेलुगू अभिनेत्री रेखा बोज असं या अभिनेत्रींचे नाव आहे. तिने सोशल मिडियावर पोस्ट करत सांगितले आहे की, जर टीम इंडियाने 2023 चा वर्ल्ड कप जिंकला तर ती विशाखापट्टणमच्या समुद्रकिनाऱ्यावर कपड्यांशिवाय फिरेल. सध्या रेखाची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होत आहे आणि नेटकरी त्यावर प्रतिक्रिया देखील देत आहे. अनेकांनी तिला ट्रोल केले आहे तर अनेकांनी लोकप्रियता आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी अशी कृती करणे लाजिरवाणी बाब असल्याचे म्हटले आहे. तसच यापुर्वी 2011 मध्ये अभिनेत्री व मॉडेल पूनम पांडेने देखील असेच वचन दिले होते की जर भारताने वर्ल्ड कप जिंकला तर ती न्यूड फोटोशूट करेल. सध्या वर्ल्ड कपचा फिवर असल्यामुळे अभिनेत्रींच्या अशा अनेक विचित्र प्रस्तावाच्या बातम्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. यापुर्वी एका मॉडेलने मोहम्मद शमीसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता. तर दुसरीकडे एका पाकिस्तानी अभिनेत्रीने बांग्लादेशच्या टिमला वचन दिले होते की जर त्यांनी भारताचा पराभव केला.

# पीएम नरेंद्र मोदींबरोबर ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान पाहणार फायनल सामना!

## कपिल देव-महेंद्रसिंग धोनीही राहणार उपस्थित

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वलचषक २०२३चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. रविवारी होणारा हा सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही स्टेडियममध्ये पोहोचणार आहेत. होय, गेल्या दोन दिवसांपासून बातम्यांमधून ही चर्चा सुरु होती. पण, आता या ऐतिहासिक फायनलचा आनंद घेण्यासाठी पीएम मोदी स्टेडियममध्ये पोहोचणार असल्याचे निश्चित झाले आहे. पीएम फायनलमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी संध्याकाळी अहमदाबादला पोहोचणार आहेत.**



त्यांच्याबरोबर हा सामना पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान रिचर्ड मार्ल्स हे देखील दिसतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी संध्याकाळी साडेचार ते पाचच्या सुमारास अहमदाबाद विमानतळावर पोहोचतील. तत्पूर्वी, पंतप्रधान राजस्थानमधील तारानगर आणि झुंझुनू येथे सभांना संबोधित करतील आणि त्यानंतर गुजरातला रवाना होतील. संध्याकाळी ते अहमदाबाद विमानतळावर पोहोचतील आणि त्यानंतर थेट राजभवनाकडे रवाना होतील. त्यांच्या स्वागतासाठी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल येथे उपस्थित राहण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे ते संध्याकाळी ५ नंतर कधीही नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर फायनल सामना पाहण्यासाठी पोहोचतील. या काळात आसाम आणि मेघालयसह दोन ते तीन राज्यांचे मुख्यमंत्रीही विश्वचषकाचा फायनल सामना पाहण्यासाठी सहभागी होणार आहेत. अंतिम सामन्यानंतर (पीएम मोदी) पुन्हा एकदा राजभवनात जातील, जिथे ते रात्रीचे जेवण करतील आणि रात्री मुक्काम करतील. त्यानंतर सोमवारी ते गुजरातमधून राजस्थानला निवडणूक प्रचारासाठी रवाना होतील. भारताचा पहिला विश्वचषक विजेता कर्णधार कपिल देवही हा सामना पाहण्यासाठी येणार आहेत. त्यांच्याशिवाय २०११ मध्ये टीम इंडियाला चॅम्पियन बनवणारा महेंद्रसिंग धोनीही स्टेडियममध्ये दिसणार आहे. त्याचबरोबर इतर संघाचे विश्वचषक विजेते कर्णधारही उपस्थित राहणार आहेत. राजीव शुक्ला, अमित शाह, जय शाह आणि अनेक सेलिब्रेटी आणि दिग्गज उद्योगपती अंतिम सामन्याचा आनंद घेण्यासाठी स्टेडियमवर पोहोचतील. अंतिम सामन्यापूर्वी अहमदाबादचे पोलीस आयुक्त ज्ञानेंद्र सिंग मलिक म्हणाले, “ऑस्ट्रेलियाचे उप-पंतप्रधान, आसामचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री आणि इतर मान्यवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील क्रिकेट विश्वचषक फायनल पाहण्यासाठी येणार आहेत. सर्व व्यवस्था करण्यात आली आहे.

### अहमदाबादमध्ये होणार सामना


आज आम्ही संध्याकाळी रिहर्सल करणार आहोत. मी लोकांना मेट्रोचा वापर करण्याचे आवाहन करतो आणि मेट्रो रात्री १ वाजेपर्यंत सुरू राहील. त्यांच्याबरोबर हा सामना पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान रिचर्ड मार्ल्स हे देखील दिसतील. एकदिवसीय विश्वलचषक २०२३चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. रविवारी होणारा हा सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही स्टेडियममध्ये पोहोचणार आहेत. होय, गेल्या दोन दिवसांपासून बातम्यांमधून ही चर्चा सुरु होती. पण, आता या ऐतिहासिक फायनलचा आनंद घेण्यासाठी पीएम मोदी स्टेडियममध्ये पोहोचणार असल्याचे निश्चित झाले आहे. पीएम फायनलमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी संध्याकाळी अहमदाबादला पोहोचणार आहेत.

# विजयासाठी किती धावा ठरणार पुरेशा?

## पीच क्युरेटरनं धावसंख्येबाबतचा अंदाज वर्तवला

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाच्या विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय संघाची कामगिरी पाहाता जेतेपद भारतालाच मिळेल असा ठाम विश्वास भारतीय क्रिकेट चाहत्यांबरोबरच अनेक तज्ज्ञ आणि जागतिक स्तरावरील आजी-माजी खेळाडू व्यक्त करत आहेत. या पार्श्वभूमीवर रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्याची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.**



भारत व ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांची कामगिरी, त्यांच्या जमेच्या बाजू, कमकुवत दुवे यावर चाहते व तज्ज्ञांमध्ये चर्चा झडत आहेत. त्यात खेळपट्टीचा मुद्दा प्रामुख्याने चर्चिला जात आहे. यादरम्यान, अंतिम सामन्याच्या खेळपट्टीवर किती धावसंख्या पुरेशी ठरेल, याबाबतचा अंदाज समोर आला आहे. भारत विरुद्ध न्यूझीलंड उपांत्य सामन्यासाठी नव्या खेळपट्टीऐवजी जुनी खेळपट्टीच वापरण्यात आल्याचा दावा आयसीसीचे खेळपट्टी सल्लागार अँडी ॲटकिन्सन यांनी केला होता. त्यापाठोपाठ आयसीसीनं असा कोणताही नियम नसल्याचा खुलासा करत यासंदर्भातली माहिती ॲटकिन्सन यांना आधीच दिली होती असंही स्पष्ट करत वादावर पडदा टाकला.

त्यामुळे आता अंतिम सामन्यातील खेळपट्टीवरूनही चर्चा सुरू झाली आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना खेळवला जाणार आहे. मात्र, या सामन्यासाठी कोणती खेळपट्टी वापरली जाईल, याविषयी अद्याप निश्चित माहिती समोर आलेली नाही.

खेळपट्टी सल्लागार ॲटकिन्सन खेळपट्टीचं निरीक्षण करून पुन्हा माघारीही परतले आहेत. त्यामुळे त्यांचं परीक्षण पूर्ण झाल्याचं आता मानलं जात आहे. दरम्यान, पीटीआयनं दिलेल्या वृत्तानुसार, बीसीसीआयचे दोन वरीष्ठ ग्राउंड स्टाफ प्रमुख आशिष भौमिक व त्यांचे सहकारी तपोश चॅटर्जी यांनी १७ नोव्हेंबर रोजी खेळपट्टी तयार करण्याच्या प्रक्रियेचा आढावा घेतला. यावेळी बीसीसीआयचे देशांतर्गत क्रिकेट व्यवस्थापक ॲबी कुरुविला हेही त्यांच्यासमवेत उपस्थित होते. दरम्यान, अंतिम सामन्यासाठी तयार करण्यात येत असलेली खेळपट्टी नेमकी कशी आहे? याबाबत स्पष्ट माहिती नसली, तरी गुजरात क्रिकेट असोसिएशनमधील पीच क्युरेटरच्या हवाल्याने पीटीआयनं यासंदर्भात महत्त्वाची अपडेट दिली आहे.

### राहुल द्रविडचं खेळपट्टीकडे लक्ष!

दरम्यान, या वृत्तात दिलेल्या माहितीनुसार, कर्णधार रोहित शर्मा व भारतीय संघाचा प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी खेळपट्टीचा अंदाज घेतला असून भौमिक व चॅटर्जी यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याचंही सांगितलं जात आहे. त्याशिवाय, पहिल्या सामन्यापासून संघाला तडाखेबाज सुरुवात करून देणारा कर्णधार रोहित शर्मानं के. एल. राहुल व रवींद्र जडेजासह शुक्रवारी प्रसिध कृष्णा, रवीचंद्रन अश्विन व इशान किशन यांच्यासमोर कसून सराव केला.